# नियमित दिवाणी दावा क्रमांक ६१२/२०२१ मधील आदेश नि.क्र.३०

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश आदेश रद्दबातल करणयात यावा तसेच कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाकरीता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.प्रतिवादी यांना समन्सची बजावणी होवुन देखील ते न्यायालयात हजर राहिले नाहीत म्हणून नि.क्र.१ वर दि.२२/०४/२०२२ रोजी दावा प्रतिवादींविरुध्द एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश पारीत करण्यात आले आहे. सदर दावा गुणदोषावर निर्णयाक करण्याकरीता व नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना दाव्यामध्ये सामील करुन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. अर्जामध्ये नमूद केलेले कारण प्रतिवादी यांचे विरुध्द पारीत झालेला आदेश व कैफियत दाखल करण्याकरिता झालेला विलंब माफ करण्याकरिता संयुक्तिक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना दाव्यात सामील करुन वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. नैसर्गिक न्यायतत्व ध्यानात घेता व न्यायाचे हित जोपासण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. वादीचे विधीज्ञांनी प्रतिवादी यांना सदर अर्ज दाखल करण्याकरीता झालेला विलंब ध्यानात घेता जास्तीत जास्त खर्च देण्याचा आदेश करण्यात यावा अशी विनंती केली. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी यांनी रक्कम रुपये रु.५००/- (रक्कम रुपये पाचशे) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ते ३ यांचेविरुध्द पारीत झालेला दि. २२/०४/२०२२ रोजीचा एकतर्फा सुनावणीचा आदेश रद्दबातल करण्यात आला. प्रतिवादी यांनी वादीस खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

HARSHADA UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UTTAM PATIL
Date: 2023.11.04 12:32:35 +0530

(श्रीमती एच.यु.यु.पाटील)

दिनांकः- ०२/११/२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>$4^{th}$ Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 02.11.2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 04.11.2023 |